www.XtremePapers.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2013**

**2 hours 30 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

*9895867771*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer any **three** questions, each on a different text. You must choose **one** question from Section 1, **one** from Section 2 and **one other**.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You may **not** take set texts into the examination.
You should write between 500 and 600 words for each answer.
You are advised to divide your time equally between your answers.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या पेनने लिहावे.
टाचणी अथवा टाचण्याची अन्य साधने, अधोरेखनासाठी रंगीत पेन, डिंक
किंवा दुरूस्तीसाठीची साधने वापरू नयेत.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारित असावा.
विभाग 1 मधून **एक** प्रश्न, विभाग 2 मधून **एक** प्रश्न व **उरलेला एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
उत्तरांसाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोशांचा उपयोग करण्यास **मनाई आहे.**
पाठ्यपुस्तके परीक्षेच्या वेळी नेता येणार **नाही.**
प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
सर्व उत्तरांना समान वेळ द्यावा.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावी.
प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा उपप्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

DC (NF/JF) 68243
© UCLES 2013

UNIVERSITY *of* CAMBRIDGE International Examinations

**[Turn over**

## विभाग – 1

**1** **संत ज्ञानेश्वर – सार्थ श्रीज्ञानेश्वरी – अध्याय अठरावा**
**(ओवी क्रमांक 1689 ते 1699)**

*तैसे गीतेचे हे दुभते। वत्स करूनि पार्थातें।*
*दुभीनली जगापुरते। श्रीकृष्णगाय।।*
*येथे जीवें जरी नाहाल। तरी हेंचि कीर होआल।*
*नातरी पाठमिषें तिंबाल। जीभचि जरी।।*
*तरी लोह एके अंशे। झगटलिया परिसें।*
*येरीकडे अपैसे। सुवर्ण होय।।*
*तैसी पाठाची ते वाटी। श्लोकपाद लावा ना जंव वोठी।*
*तंव ब्रह्मतेची पुष्टी। येईल आंगा।।*
*ना येणेसी तोंड वांकडें। करूनि ठाकाल कानवडें।*
*तरी कानींहि घेतां पडे। तेचि लेख।।*
*जे हे श्रवणें पाठें अर्थे। गीता नेदी मोक्षाआरौतें।*
*जैसा समर्थु दाता कोणाते। नास्ति न म्हणे।।*
*म्हणौनि जाणतया सवा। गीताचि येकी सेवा।*
*काय कराल आघवां। शास्त्रीं येरी।।*
*आणि कृष्णार्जुनी मोकळी। गोठी चावळिली जे निराळी।*
*ते श्रीव्यासें केली करतळीं। घेवों ये ऐसी।।*
*बाळकाते वोरसे। माय जैं जेवउं बैसे।*
*तैं तया ठाकती तैसे। घांस करी।।*
*कां अफाटा समीरणा। आपैतेपण शहाणा।*
*केलें जैसें विंजणा। निर्मूनियां।।*
*तैसे शब्दे जें न लभे। तें घडूनियां अनुष्टुभें।*
*स्त्रीशूद्रादि प्रतिभे। सामाविलें।।*

**(अ) (i)** संत ज्ञानदेवांनी गीतेचे माहात्म्य कशाप्रकारे विशद केले आहे ?
**(ii)** ईश्वराजवळ ते कोणते मागणे मागतात ?
**(iii)** ''केले ज्ञानदेवे गीते। देशीकार लेणे'' या ओळींचा अन्वयार्थ अठराव्या अध्यायाच्या संदर्भात स्पष्ट करा ? [25]

**अथवा**

**(ब)** अठराव्या अध्यायातील प्रतिपाद्य विषयाची सोदाहरण चर्चा करा. [25]

**2** **संत तुकाराम – सार्थ श्री तुकारामाची गाथा**
**(अभंग क्रमांक 1431 ते 1432)**

*न लगे पाहावें अबद्ध वाकडे। उच्चारावे कोडे नाम तुझे ।।*
*नाही काळ वेळ पंडितांचा धाक। होत कां वाचक वेदवक्ते।।*
*वेदीं जें प्रतिपाद्य न कळे पाहातां। तैशी या अनंता ठेवूं नामें।।*
*आपुलिया मना उपजे आनंद। तैसे करू छंद कथाकाळी।।*
*तुका म्हणे आम्ही आनंदेचि धालो। आनंदचि ल्यालो अळंकार।।*

*दैन्य दुःख आम्हा न येती जवळी। दहन हे होळी होती दोष।।*
*सर्व सुखे येती माने लोटांगणी। कोण यांसी आणी दृष्टीपुढे।।*
*आमची आवडी संतसमागम। आणीक त्या नाम विठोबाचे।।*
*आमुचे मागणे मागो त्याची सेवा। मोक्षाची निर्दैवा कोण चाड।।*
*तुका म्हणे पोटी साठविला देव। न्यून तो हा भाव कोण आम्हां।।*

**(अ) (i)** नामस्मरणाचा आनंद तुकाराम महाराज कसा व्यक्त करतात ?
**(ii)** 'तुका म्हणे पोटी साठविला देव' ह्या तुकोबावचनाचा अर्थ काय ?
**(iii)** दुःखदैन्याचा निरास कशामुळे होतो ? [25]

**अथवा**

**(ब)** संत तुकारामांच्या नाममाहात्म्यपर अभंगांचे वेगळेपण अभ्यासक्रमातील अभंगांच्या आधारे स्पष्ट करा. [25]

© UCLES 2013

**3 मंगेश पाडगावकर – कविता – जिप्सी**

*एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून.*
*आठवते बालपण जेव्हा होतो मी खेळत*
*होतो बांधीत मी घर सवंगड्यांच्या संगत*
*कौले पानांची घराला आणि झावळ्यांच्या भिंती*
*आठवते अजुनहि होतो रंगत मी किती!*
*पण अकस्मात होतो जात सारे उधळून*
*एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून.*

....................

*कधी कधी पहाटते उरी आगळी प्रतीती*
*जाळीमधून धुक्याच्या तेज झिरपते चित्ती*
*जाचू लागते जिप्सीला ज्ञात विश्वाची चौकट*
*आणि जाणवते काही गूढ......अंधुक......पुसट!*
*खेळ मांडिलेला सारा पुन्हा उधळाया सजे*
*आपणच निर्मिलेले आपणच मोडू धजे*
*गूढ अज्ञात धुक्यांत आणि जातसे बुडून*
*एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून.*
*घर असूनहि आता घर उरलेले नाही*
*चार भिंतीची जिप्सीला ओढ राहिलेली नाही*
*कुणी सांगावे? असेल पूर्वजन्मीचा हा शाप*
*घडी सुस्थिरपणाची विसकटे आपोआप...*
*कुणी तरी साद घाली दूर अनंतामधून........*
*एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून.*

**(अ) (i)** कविमनातली जिप्सी बालपणीही कशी अस्तित्वात होती ?

**(ii)** अज्ञाताची ओढ कवितेतून कशी प्रकटते ?

**(iii)** प्रस्तुत कवितेचे मध्यवर्ती आशयसूत्र उलगडून दाखवा. [25]

**अथवा**

**(ब)** पाडगावकरांच्या काव्यलेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये साधार विशद करा. [25]

© UCLES 2013

## विभाग – 2

**4 जयवंत दळवी – नाटक – संध्याछाया**

**(अ)** 'संध्याछाया' या नाटकातून वृद्धांचे भावविश्व प्रभावीपणे प्रकट होते का ? चर्चा करा. [25]

**अथवा**

**(ब)** 'संध्याछाया' या दळवीकृत नाटकाची वाङ्.मयीन सामर्थ्यस्थळे कोणती ? सोदाहरण विशद करा. [25]

**5 मराठी लघुकथा – कथासंग्रह**

**(अ)** 'माझे दत्तक वडील' मधील विनोदाचे स्वरूप कथासूत्राच्या आधारे स्पष्ट करा. [25]

**अथवा**

**(ब)** 'मारुतराया' कथेतून ग्रामीण जनजीवनातील परंपरांचे आणि श्रद्धांचे प्रभावी चित्र माडगूळकरांनी कसे रेखाटले आहे ? [25]

**6 रणजित देसाई – कादंबरी – पावनखिंड**

**(अ)** 'पावनखिंड' या कादंबरीची वाङ्.मयीन वैशिष्ट्ये साधार विशद करा. [25]

**अथवा**

**(ब)** 'पावनखिंड' कादंबरीतील ऐतिहासिक पात्रांचे व्यक्तिदर्शन कादंबरीकार कसे घडवतात ? विविध व्यक्तिरेखांच्या आधारे विश्लेषण करा. [25]

© UCLES 2013

BLANK PAGE

© UCLES 2013 

**BLANK PAGE**

© UCLES 2013

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.